Seat No.

# महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीची
# कनिष्ठ महाविद्यालये / उच्च माध्यमिक विद्यालये
## पूर्व परीक्षा - (२०१८-२०१९)

स्थापना १८६०

इयत्ता : १२ वी | विषय : मराठी | गुण : ८०

दिनांक : ८-१-२०१९ | वेळ : ९ ते १२

### विभाग १ निबंध लेखन

**कृती १ : खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे ३०० शब्दापर्यंत निबंध लिहा.** [१०]

१) पाण्याचे व्यवस्थापन : काळाची गरज

२) पृथ्वीचे मनोगत

३) माझ्या आठवणीतील प्रवास

४) भ्रमणध्वनी (मोबाईल) बंद झाले तर....

### विभाग २ गद्य विभाग [१२]

**कृती २ : खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** (४)

**१) आकृती पूर्ण करा.** १

योग्य शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमधले
हे गुण वाढीला लागतात.

→ [ ] → [ ]

**२) डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे शिक्षक** [ ] १

आपल्या हे लक्षात येतं की नाही हे माहिती नाही परंतु आपल्या बालपणामध्ये आयुष्याच्या वेगवेगळ्या वळणांवर आपण कोणाला ना कोणाला तरी आपला 'आदर्श' मानत असतो. म्हणून मी म्हटले, 'तुम्ही मोठे होत असताना साधारणपणे पंधरा वर्षांपर्यंत तुमच्या समोरचे उत्कृष्ट आदर्श म्हणजे तुमचे आई, वडील आणि शाळेतील शिक्षक ! माझ्या मताप्रमाणे ही तीन माणसें त्या काळात अत्यंत चांगले संस्कार घडवू शकतात.' मग मी तिथे हजर असलेल्या शिक्षक आणि पालकांकडे वळून म्हणालो की, 'पहा तुमच्यावर केवढी मोठी जबाबदारी आहे ते ! विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या व्यक्तींकडूनच होऊ शकतो.' मी लहान असताना दररोज माझे आई-वडील अडल्यानडल्याला यथाशक्ती मदत करताना दिसायचे. माझ्या वडिलांना सातत्याने सांगून

आणि पैशांचा विचार बाजूला ठेवायला लावून माझ्या शिक्षकांनी म्हणजे शिवसुब्रमणियम अय्यर यांनी मला त्यांना शाळेत घालायला लावले. मुलांना सहृदयी, उत्साही व कामसू बनवण्याच्या दृष्टीने सर्व पालकांनी सातत्याने प्रयत्न करायला हवेत. विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती वाढवणे आणि त्यामधून त्यांच्यासमोर आपला आदर्श उभा करणे ही जबाबदारी शिक्षकांवर येते; कारण शिक्षक हा विद्यार्थ्याला ज्ञानामृताचे कलश खुले करून देत असतो. शिक्षक–आई–वडील हाच खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांसमोरचा 'आदर्श' असा त्रिकोण आहे. मी तर याही पुढे जाऊन म्हणेन की विद्यार्थ्यांचं आयुष्य घडवण्यासाठी जर फक्त पालक आणि शिक्षकांनी योग्य मार्गदर्शन केलं तर भारताचं चित्र काही वेगळंच दिसेल. असं म्हणतात की पालकांच्या पाठीमागे शाळा आणि शिक्षकांच्या पाठीमागे घर उभे असते. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातल्या संबंधांना व्यावसायिक रूप न येता त्यांच्या संबंधामागे 'राष्ट्राची प्रगती' हा विचार हवा. योग्य शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमधले सभ्यपणा आणि स्वाभिमान हे गुण वाढीला लागतात. कुठलाही कायदा करून या गुणांचे संस्करण होत नाही तर ह्यांच्या वाढीसाठी केवळ योग्य संस्कारांचीच गरज असते आणि ते फक्त आपणच करू शकतो.

३) मुलांच्या पौंगडावस्थेपर्यंत आई, वडील, शिक्षक यांच्या संस्काराचा प्रभाव मुलांवर कसा पडतो ? हे तुमच्या शब्दांत ८ ते १० ओळींत लिहा. २

**ब) खालील उताऱ्याच्या आधारे कृती करा.** (४)

पाच वाजता एका अनोख्या कल्पनेने मी ताडकन् उठलो, स्कूटर काढून सुसाटत निघालो.... वेळ थोडा होता अन् कामे खूप होती !

रात्री गाडी सुटण्याच्या अगोदर जेमतेम पाच मिनिटे अगोदर मी प्लॅटफॉर्मवर श्री उन्नीकृष्णनना गाठले ! लगेच पावतीसकट एक भला मोठा हारा त्यांच्या स्वाधीन केला.

''ये क्या है?'' त्यांनी स्निग्धतेने विचारले.

मी हाऱ्याचे झाकण बाजूला केले अन् उन्नीकृष्णनचा चेहरा एकाएकी अत्यानंदाने फुलला. आत निरनिराळ्या जातींची – रंगांची वीस-पंचवीस फुलझाडांची रोपे होती बऱ्याच नर्सरीज धुंडाळून आणलेली – माझ्या संध्याकाळच्या धावपळीची फलश्रुती... नव्हे नव्हे – फूलश्रुती !!!

''आपने आपके सब बच्चे मेरे हाथ सौप दिया... अब ये मेरे भी कुछ ले जाइए.... उधर संभालनेके लिए.'' मी हसतच म्हणालो.

त्यांनी अत्यंत प्रेमभराने माझे हात दाबले, त्या रोपांकडे पहात म्हणाले, ''शुअर माय डिअर.... शुअर.... आय विल बी व्हेरी हॅपी टू कॅरी दीज यंग वन्स टू माय नेटीव प्लेस.... माय वाईफ वील बी डिलाइटेड टू रिसिव्ह देम !... शायद हम जिंदगी मे फिर मिले या ना मिले लेकिन.... दीज वील बी माय स्वीट मेमरीज.''

''अँड माइन टू'' – मी.

गाडीने शिट्टी दिली. मी चटकन वाकून त्यांना नमस्कार केला. त्यांनी मला उठवून घट्ट मिठी मारली. क्षणभरातच सावरून त्यांनी हारा उचलला.... एखादा लाख मोलाचा दागिना उचलावा तसा.

गाडी सुटली. मी अश्रू आवरण्याचे मुळीच प्रयत्न केले नाहीत. ते दुःखाश्रू होते की आनंदाश्रू ? निश्चितच आनंदाश्रू ! तुकोबांसारखा एक वृक्षवल्लींचा सोयरा आयुष्यात भेटल्याचे !!!

१) लेखकांनी उन्नीकृष्णनला रोपट्यांचा हारा रेल्वे स्टेशनवर भेट दिला, या प्रसंगाचे वर्णन १२ ते १५ ओळींत शब्दांत तुमच्या शब्दात लिहा. ४

**किंवा**

१) 'निसर्ग माझा सखा' ह्या विषयावर १२ ते १५ ओळींत लेखन करा.

**क) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** (४)

१) जपान ज्या संकटांनी खचला नाही त्यापैकी दोन संकटे १

१) ......................

२) ......................

२) सामान्य माणसाच्या इवल्याशा मनगटात आहे – [ ] १

जपानचं मोठ्ठं उदाहरण डोळ्यापुढे ठेवायला हवं. बेचिराख जपान आधी युद्धामुळे, मग विविध निसर्गसंकटामुळे खचला नाही, उलट जपानने आपल्यावरील संकटाचेच पंख केले. बळ एकवटून साऱ्या राष्ट्राने झेप घेतली. विमान जेव्हा अवकाशात झेपावते, तेव्हा ते संपूर्णच्या संपूर्ण उड्डाणासाठी सज्ज होते. सामान्य माणसाने आपण स्वत:ला बळ एकवटून सज्ज ठेवायला हवे. विशेष म्हणजे भारतीयांमध्ये संघर्ष करण्याची व जिद्दीने यशस्वी होण्याची अपार ताकद आहे. त्या शक्तीमागे सहस्र वर्षांची तेजस्वी परंपरा आहे. आपल्या ऋषी-मुनींनी, श्री महावीर, श्री गौतम बुद्ध आदी विलक्षण प्रज्ञेच्या योगीजनांनी, श्री रामकृष्ण आदी दैवी पुरुषांनी जे पेरले ते उगवणारच, हा अगम्य विश्वास आपल्या सामान्य माणसाच्या इवल्याशा मनगटामागे आहे; परंतु आता ती मनगटे हाताची घडी घालून बगलेत बंदिस्त ठेवून उपयोगी नाहीत, प्रज्वलित करायला हवीत.

भारतमातेच्या उरात दडलेल्या समृद्ध, सहिष्णू सर्वसमावेशक, स्वधर्म, त्याचा 'संचार' आता प्रत्येक भारतीयात व्हायला हवा.

– प्रवीण दवणे

३) 'जपानने आपल्यावरील संकटाचेच पंख केले' या वाक्यातील आशय तुमच्या शब्दांत ८ ते १० ओळींत लिहा. २

## विभाग ३ पद्य विभाग [८]

**कृती ३ अ) खालील ओवी रचनेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** (४)

१) मैत्रिणी, स्त्रिया यांच्या संदर्भातील कवितेतील ओळ शोधून ती पुढील चौकटीत लिहा. १

[ ]

२) दिलेल्या शब्दांना कवितेत आलेले समानार्थी शब्द लिहा. १

१) नवरा ☐ २) संसार ☐

सुंदर माझें जातें गे फिरे बहुतेकें।
ओंव्या गाऊं कौतुकें तूं येरे बा विठ्ठला ।।१ ।।
जीवशिव दोनी खुंटे गे प्रपंचाचे नेटें गे।
लावुनी पांचीं बोटें गे तू येरे बा विठ्ठला ।।२ ।।
सासु आणि सासरा दीर तो तिसरा।
ओंव्या गाऊं भ्रतारा तूं येरे बा विठ्ठला ।।३ ।।
बारा सोळा गडणी अवघ्या कामिनी।
ओंव्या गाऊं बसूनि तूं येरे बा विठ्ठला ।।४ ।।
प्रपंचदळण दळिलें पीठ भरिलें।
सासुपुढें ठेविलें तूं येरे बा विठ्ठला ।।५ ।।
सत्त्वाचें आधण ठेविलें पुण्य वैरिलें।
पाप तें उतूं गेलें तूं येरे बा विठ्ठला ।।६ ।।
जनी जातें गाइल कीर्त राहिल।
थोडासा लाभ होईल तूं येरे बा विठ्ठल ।।७ ।।

**३) खालील चरणांतील भावसौंदर्य ८ ते १० ओळींत स्पष्ट करा.** २

'जीवशिव दोनी खुंटे गे प्रपंचाचे नेटें गे।
लावुनी पांचीं बोटें गे तूं ये रे बा विठ्ठला ।।

**ब) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** (४)

कसे देवाचे आकाश त्याचे कोरडेच डोळे
जीव किती हे जळावे माझ्या धरतीचे भोळे
मायमातीची लेकरं त्यांना आसवांची वाट
वाट पाहता पाहता होई रात्रीची पहाट
पहाटेच्या प्रहराला स्वप्न अंकुराचे जळे

झाला भुईचा दुष्मान दुष्ट दुष्काळ सारखा
आटलेला हा पाऊस ढगा-जगाला पारखा
माणसाच्या प्राक्तानाशी नित्य निसर्ग का खेळे

झुंज वावराच्यासाठी झुंज माळरानासाठी
देता देता वाहतील झरे गर्भातले पाठी
उदास हे वाळलेले पुन्हा बहरतील मळे

१) 'बहरतील मळे' या कवितेतून व्यक्त झालेला आशावाद १२ ते १५ ओळींत विशद करा. ४

**किंवा**

१) 'शेतकरी आणि निसर्ग' यांच्यातील नाते १२ ते १५ ओळींत तुमच्या शब्दांत लिहा.

## विभाग ४ – व्याकरण [१२]

**कृती ४ अ) खाली दिलेल्या पर्यायांतून निर्दोष शब्द ओळखून चौकटीत लिहा.** २

१) य) पूर्वग्रह र) पुर्वग्रह ल) पुरवग्रह व) पूर्वगृह [ ]

२) य) पुर्नविवाह र) पूर्नविवाह ल) पूनर्विवाह व) पुनर्विवाह [ ]

**आ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ वाक्यप्रचारांसमोरील चौकटीत लिहा.** २

१) य) मोडून टाकणे र) मनाला लहर येणे
ल) इच्छा पूर्ण होणे व) निरुपयोगी ठरवणे

१) मोडीत काढणे [ ]

२) मनोरथ पूर्ण होणे [ ]

**इ) खालील वाक्यातील वाक्यप्रकाराचा योग्य पर्याय ओळखून चौकटीत लिहा.** २

१) त्यांनी का बरं आपल्याला घरी बोलावलं असेल ?

य) नकारार्थी र) उद्गारार्थी ल) विधानार्थी व) प्रश्नार्थी

[ ]

२) मी कधीच वेड्यासारखे समुद्राकडे पाहायचे थांबवले नाही.

य) नकारार्थी र) प्रश्नार्थी ल) उद्गारार्थी व) विधानार्थी

**ई) खालील वाक्यात येणाऱ्या योग्य विरामचिन्हांचा पर्याय निवडून चौकटीत लिहा.** २

१) त्या स्वत: भारतरत्न या पदवीने विभूषित आहेत

य) एकेरी अवतरण, पूर्णविराम र) स्वल्पविराम, पूर्णविराम

ल) दुहेरी अवतरण, स्वल्पविराम व) उद्गारचिन्ह, प्रश्नचिन्ह

२) हूनहून काय हुईल काय आसं

य) स्वल्पविराम, पूर्णविराम र) दुहेरी अवतरण, प्रश्नचिन्ह

ल) उद्गारचिन्ह, प्रश्नचिन्ह व) एकेरी अवतरण, पूर्णविराम

**उ) खालील विधानातील व पद्य पंक्तीतील रस ओळखून चौकटीत लिहा.** २

१) एका घड्याळ्यासाठी प्राण गमावलेल्या त्या जवानाच्या मृतदेहाकडे आम्ही दोघंही असहाय्यपणे पहात राहिलो.

य) रौद्ररस र) शांतरस ल) करुणरस व) शृंगाररस

२) स्वप्नात तुझ्यामागे कुणी जल्लाद धावताहे.

य) भयानक रस र) रौद्ररस ल) शांतरस व) बीभत्स रस

**ऊ) खाली दिलेल्या पर्यायांतून पारिभाषिक शब्दांसाठी योग्य पर्याय निवडून चौकटीत लिहा.** २

य) विश्वासपात्र र) ब्रीदवाक्य ल) स्मरणचिन्ह व) अर्हतापात्र

१) Qualified

२) Motto

## विभाग ५ विनोद – एक वाङ्मय प्रकार [८]

**कृती ५ खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(८)**

१) विसंगतीत एकमेकांत मिसळलेले दोन प्रांत – १

☐ ☐

२) पु. ल. देशपांडे यांच्या लेखनात ठासून भरलेले विनोदाचे दोन प्रकार – १

☐ ☐

क्रीडांगणावर आपण खदखदून हसतो, कारण नेहमीच्या साचेबद्ध जीवनाच्या चक्रातून आपल्याला काही काळ मोकळीक मिळालेली असते. थोडक्यात, दुःख व सुख, निराशा व आशा, बंधन व मोकळीक ह्या दोन परस्पर विरुद्ध भावनांचा अनुभव आपल्याला एकाएकी, अचानक व अनपेक्षितपणे आलेला असतो, सुखाची जाणीव होत असते म्हणूनच त्या त्या वेळी आपण हसत असतो.

**वाङ्मयीन दृष्टिकोनातून विनोदाचे स्वरूप –**

विसंगतीची जाणीव ही सुखकारक असते तशीच दुःखदायकही असते; म्हणूनच हास्य व कारुण्य ह्यांचे प्रांत एकमेकांत मिसळून गेलेले असतात. मानवी जीवनातील विसंगतीतून विनोदाची निर्मिती होते. या विसंगतीमागे अनेकदा दुःखाची झालर असू शकते.

उदा. चार्ली चॅप्लिनचे चित्रपट बघताना हसता हसताच आपले डोळे करुणेने भरून येतात. त्यांच्या चित्रपटांतून मानवीजीवनातील कारुण्य व आनंद यांचे अतिशय परिणामकारक संमिश्र चित्रण आढळते.

पु. ल. देशपांडे यांच्या लेखनात शब्दनिष्ठ, कल्पनानिष्ठ, स्वभावनिष्ठ व प्रासंगिक विनोद ठासून भरलेले आहेत. त्यांच्या अनेक नाटकांतून, प्रवासवर्णनातून, कथालेखनातून, व्यक्तिचित्रणांतून विनोदाचा झरा वाहत असतो. आपण त्याचा अनुभव घेत खुदुखुदू हसत असतो आणि अंतर्मुखही होतो.

३) 'साचेबद्ध जीवनातून मोकळीक मिळाली की, माणूस मनसोक्त हसतो व आनंदित होतो'. यामागची कारणे तुमच्या शब्दांत लिहा. ४

**किंवा**

माणसाने नेहमी आनंदी रहावे याविषयीचे तुमचे मत लिहा.

४) तुम्ही अनुभवलेला एखादा विनोदी प्रसंग ८ ते १० ओळींत लिहा. २

## विभाग ६ – सर्जनशील लेखन [१०]

कृती ६ अ) खालील कवितेचे १५ ते २० ओळींत रसग्रहण करा. (६)

**माझ्या मराठीची गोडी**

माझ्या मराठीची गोडी
मला वाटते अवीट
माझ्या मराठीचा छंद
मना नित्य मोहवित

ज्ञानोबांची तुकयाची
मुक्तेशाची जनाईची
माझी मराठी गोडी
रामदास शिवाजीची

'या रे, या रे अवघे जण,
हाक मायमराठीची
बंध खळाळा गळाले
साक्ष भीमेच्या पाण्याची

डफ तुणतुणे घेऊन
उभी शाही मंडळी
मुजऱ्याची मानकरी
वीरांची ही मायबोली

कृष्णा गोदा सिंधुजळ
हिची वाढवती कांती
आचार्यांचे आशीर्वाद
हिच्या मुखी वेद होती

माझ्या मराठीची थोरी
नित्य नवे रुप दावी
अवनत होई माथा
मुखी उमटते ओवी

वि. म. कुलकर्णी

**किंवा**

**अ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर १५ ते २० ओळींत संवाद लेखन करा.**

१) 'अभ्यासाच्या दृष्टीने संगणकाची उपयुक्तता' याबाबत दोन मित्रांमधील/मैत्रिणींमधील संवाद.

२) 'वाचनाचे महत्त्व' या विषयावर दोन विद्यार्थी/विद्यार्थिनींमधील संवाद.

३) गुणवंत पुरस्कार प्राप्त शालेय विद्यार्थ्याशी साधलेला संवाद.

**ब) १) गटात न बसणारा शब्द ओळखून लिहा.** १

तोरा .....................................................................

रुबाब, ऐट, दिमाख, सारा

**२) खालील शब्दासाठी योग्य समानार्थी शब्द लिहा.** १

मनमुराद – [ ]

१) मनसोक्त २) मनोरथ ३) मनोकामना ४) मनोहर

**३) खालील विधानातील पूर्णाभ्यस्त शब्द शोधून लिहा.** १

वाक्य – राहिलेले अंतर झपझप तोडून तुकाराम त्याच्या जवळ गेला.

पूर्णाभ्यस्त शब्द – [ ]

**४) खालील विधानातून दोन विशेषणे शोधून लिहा.** १

हिराची आई तुरतुरीत नाकाची अन केवड्याच्या रंगाची होती

विशेषणे

[ ] [ ]

**विभाग ७ – उपयोजित लेखन** २०

**कृती ७ अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** १०

१) खालील मुद्द्यांच्या आधारे वृत्तपत्रातील लेखांचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

वृत्तलेख – लोकरुची वार्ता – प्रासंगिक लेख – दुर्घटनेवर आधारित लेख.

**२) खालील मुद्द्यांच्या आधारे 'आर.जे.' ची वैशिष्ट्ये सुमारे १५ ते २० ओळींत लिहा.**

आर. जे. – रेडिओ जॉकी – भाषेवर प्रभुत्त्व – सलग दोन-तीन तास खिळवून ठेवण्याची क्षमता – मिश्रभाषा प्रयोग – रंजकता – विविध क्लृप्त्या – उत्साहवर्धकता – श्रोत्यांशी मनमोकळा संवाद.

**३) खालील मुद्द्यांच्या आधारे दूरचित्रवाणीवरील बातमी लिहिताना घ्यायची काळजी स्पष्ट करा.**

सर्व वयोगटांसाठी – लहान लहान वाक्ये – दृश्यांसोबत बोलायचे असते – अनुसरून भाषा – विरामाच्या खुणा लेखनात करणे – एका पानावर एक बातमी – बोलण्यातील भाषा गरजेची.

**ब) खालीलपैकी एका विषयावर मुलाखत पूर्व प्रश्नावली तयार करा. १० ते १२ प्रश्न अपेक्षित.** ५

१) कचरा गोळा करणाऱ्या गाडीवरच्या कामगाराची मुलाखत.

२) जिल्हास्तरीय स्पर्धेत 'स्वच्छ व सुंदर शाळा' हे पारितोषिक प्राप्त केलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकाची मुलाखत.

३) 'कमवा व शिका' योजनेचा लाभ घेऊन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याची मुलाखत.

**क) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** ५

१) सामाजिक संपर्कासाठी संकेतस्थाने १

१) ...................... २) ..............................

२) इलेक्ट्रॉनिक्स माध्यमाचा 'बातमी'वर झालेला परिणाम एका वाक्यात लिहा. १

३) खालील मराठी शब्दांना 'इंग्रजी' प्रतिशब्द लिहा. १

१) महाजाल [ ] २) संकेतस्थळ [ ]

ग्रामीण भागात रिकाम्या वेळात चव्हाट्यावर बसून गप्पा मारल्या जातात. शहरी भागातही वेगवेगळ्या ठिकाणी गप्पांचे अड्डे जमतात. हाच प्रकार महाजालाच्या साहाय्याने होतो, तेव्हा त्याला सामाजिक संपर्कासाठी संकेतस्थाने (Social networking) म्हटले जाते. आपल्याकडे 'ऑर्कुट', 'फेसबुक', 'ट्विटर' या सारखी सामाजिक संपर्कासाठी संकेतस्थाने लोकप्रिय आहेत. अमेरिकेत 'माय स्पेस' असेच लोकप्रिय आहे. यातील काहींची लोकप्रियता कमी होत जाऊ शकते किंवा काही नव्या संकेतस्थानांची अजून भर पडू शकेल. मात्र हे संपर्कमाध्यम वाढत जाणार हे नक्की. ही संकेतस्थाने वय, वर्ग, जाती, धर्म, भाषा, राष्ट्र यांच्या भिंती तोडून लोकांना परस्परांशी संपर्क साधायला, संवाद साधायला एकत्र आणत आहेत. या संकेतस्थानांवर आपण मराठी भाषक एकत्र येऊन देवनागरी लिपीतून गप्पा करू शकतो. या नव्या माध्यमामुळे बातम्यांचा वेग वाढला आहे. म्हणजे असे की, पूर्वी वृत्तपत्रातून बातमी समजायला चोवीस तास थांबावे लागत होते. नंतर इलेक्ट्रॉनिक्स माध्यमामुळे बातम्यांचा वेग वाढत गेला आणि ती काही वेळात कळायला लागली. पण तरीही साधारण अर्धा तास मध्ये जात होता. आता कुठेही काहीही घडले की भ्रमणध्वनी किंवा चलध्वनी (मोबाईल फोन) मधील कॅमेरा वापरून घटनेचे छायाचित्र घेऊन महाजालाद्वारा संपर्क साधून सामाजिक संपर्कासाठीच्या संकेतस्थानांवरून ती त्याचक्षणी प्रसारित करणे शक्य झाले आहे. नव्या माहितीचा वेग वाढला आहे. या संकेतस्थानांपासून धोके अनेक आहेत. पण ती गंभीरपणे वापरली तर त्याचा उपयोगही खूप आहे.

४) 'सामाजिक संपर्कासाठी संकेतस्थानांची उपयुक्तता' तुमच्या शब्दांत ८ ते १० ओळींत लिहा. २

● ● ●